श्री. अर्जुन शंकर पठाडे , स्थापत्य अभियांत्रिकी सहायक,जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत--

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम ( उत्तर) विभाग
आदेश क्र.बांध/आस्था-३/६६०/२०२५
अहिल्यानगर दिनांक- खालील नमूद स्वाक्षरी 27/01/2026

संदर्भः- १. पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक अहिल्यानगर यांचे पत्र गु.रं.नं. ३०१७ २०१४ दिनांकः- ०४/०६/२०१४

२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहिल्यानगर यांचेकडील सेवा निलंबन आदेश क्र.बांध/कार्या/आस्था-वेतन/३१८/१४, दि-३०/०६/२०१४

३. मा. सहायक आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे विभागीय चौकशी सुरु केली त्यांचा चौकशी अहवाल क्र. विकास-४/खा.चौ./सी.आर/२२७/२०१४, दि-०४/१२/२०१५

३. मा.जिल्हा सत्र न्यायालय अहिल्यानगर यांचेकडील न्यायनिर्णय दि-०७/१२/२०२३

४.उपअभियंता जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी यांचे पत्र क्र.जा.क्र./बांध/ चित्र/ आस्था/ १३३/२०२५

५.श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांचा मुळ अर्ज दि- ०१/०४/२०२५

६.पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक अहिल्यानगर जा.क्र.ला.प्र.वि/ अ.नगर युनिट/२०२५/२००५, पोलीस उपअधीक्षक, कार्यालय, ला.प्र.वि,दिः- ०६/०८/२०२५

७.याकार्यालयाचे पत्र क्रमांक कार्या.१/आस्था.३/४२८/२०२५दिनांक २९/९/२०२५

८. याकार्यालयाचे पत्र क्रमांक कार्या.१/आस्था.३/७१९/२०२५दिनांक ०२/१२/२०२५

९.मा. पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ३६०२/ २०२५ दिनांक २५/१२/२०२५

१०.महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वयेतर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७० व ७२ (४) (३)

ज्याअर्थी श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना संदर्भ-१ अन्वये पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक अहिल्यानगर यांचे विरुध्द दि- ०४/०६/२०१४ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो अहमदनगर यांनी तालुका पोलीस स्टेशन शेवगाव येथे गु.रं.नं.३०१७/२०१४ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कायदा कलम ७,१२,१३(१)ड सह १ ३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ज्याअर्थी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कडील आदेश क्र.बांध/कार्या/आस्था-वेतन/३१८/१४ दि-३०/०६/२०१४ रोजी दि-०४/०६/२०१४ पासून निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर श्री.अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांचेविरुध्द मा. सहायक आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे विभागीय चौकशी सुरु केली त्यांचा चौकशी अहवाल क्र. विकास-४/ खा.चौ./ सी.आर/ २२७/२०१४, दि-०४/१२/२०१५ अन्वये प्राप्त झाला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे नमुद केले आहे.

ज्याअर्थी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. बांध/ आस्था-१/चौकशी/८९२/२०१६ दि- ०७/०९/२०१६ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग नेवासा येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या अकार्यकारी पदावर पुनर्स्थापित करण्यात आले असून सदयस्थीतीत श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथर्डी येथे कार्यरत आहेत.

ज्याअर्थी मा.जिल्हा सत्र न्यायालय अहिल्यानगर येथे चालू असलेल्या न्यायालयीन प्रकरणी १४/२०१४ बाबत मा. न्यायालयाने दिनांक ७/१२/२०२३ रोजी अर्जुन शंकर पठाडे यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७, १३ (१) (ड) आर/डब्ल्यू कलम १३ (२) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांमधून फौजदारी दंड संहितेच्या कलम २३५ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात आले आहे व जामीनपत्र रद्द करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

ज्याअर्थी श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. मा.जिल्हा सत्र न्यायालय अहिल्यानगर येथे चालू असलेल्या न्यायालयीन प्रकरणी १४/२०१४ बाबत मा. न्यायालयाने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७, १३ (१) (ड) आर/डब्ल्यू कलम १३ (२) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांमधून फौजदारी दंड संहितेच्या कलम २३५ (१) नुसार निर्दोष मुक्त केले आहे.

त्याअर्थी उक्त प्रकरणी प्रकरणी निर्दोष मुक्ततेच्या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे Appeal by State No. ३१४३/२०२४ दाखल करण्यात आलेले असल्याचे कळविण्यात आले आहे, तथापि, न्यायालयीन आदेशास स्थगिती (Stay) मंजूर आहे किंवा नाही याबाबत संदर्भ क्रमांक.०७ व ८ अन्वये अभिप्राय सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक.९ अन्वये श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, जि.प.सा.बां. उप विभाग पाथर्डी यांचेविरूध्द शेवगाव पोलीस ठाणे गु.र.नं. ३०१७/२०१४ भ्र.प्र. अधि.१९८८ चे क.७,१३ (१) (ड), १३(२) प्रमाणे दि. ०४/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मा. विशेष न्यायालय, अहिल्यानगर यांनी सदर खटल्याचा न्यायनिर्णय दि. ०७/१२/२०२५ रोजी दिला असुन त्यात श्री. अर्जुन शंकर पठाडे यांना निर्दोष मुक्त केलेले आहे. सदर न्यायनिर्णय विरूध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ औरंगाबाद येथे शासनातर्फे अपील नं. ३१४३/२०२४ अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. सदर अपील मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित आहे. अद्याप सदर खटल्यावर सुनावणीची पुढील तारीख अद्याप नेमलेली नाही. अथवा न्यायनिर्णय झालेला नसले बाबत कळविलेले आहे, परंतु न्यायालयीन आदेशास स्थगिती (Stay) बाबत कळविलेले नसल्यामुळे व अशा परिस्थितीत, श्री. अर्जुन शंकर पठाडे हे दिनांक ३१/०५/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार (Principles of Natural Justice) त्यांच्या निलंबन कालावधीबाबत योग्य तो निर्णय घेणे अपरिहार्य व आवश्यक ठरते.

ज्याअर्थी श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या विनंती अर्ज तसेच उपअभियंता जि.प.सा.बां. उपविभाग पाथर्डी नुसार त्यांचा सेवा निलंबन कालावधी दि-०४/०६/२०१४ ते दि-०७/०९/२०१६ अखेर ०२ वर्ष ०३ महिने ०३ दिवस हा कालावधी नियमित होणेबाबतचा अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन , बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम २ नुसार सेवा निलंबन कालावधी सर्व कारणांसाठी सेवा कालावधी धरणे समर्थनीय आहे.

ज्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ ( पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन , बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम २ च्या तरतूदीस अधिन राहून श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा दिनांक ४/६/२०१४ ते ७/९/२०१६ याकालावधील २ वर्ष ३ महिने व ३ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. अर्जुन शंकर पठाडे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी यांचे मूळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व पुढील कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.
सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.( 202601271 8009 ) असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-01-2026 19:02:28
(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. अर्जुन शंकर पठाडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी ता.पाथर्डी
व्दारा- उप अभियंताजि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी
प्रत- उपअभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी ता.पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत व सेवा पुस्तकात सदर आदेशाची नोंद घेतलेल्या पानाची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.
प्रत- गटविकास अधिकारी , पंचायत समिती पाथर्डी/शेवगाव
प्रत- मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य ) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी स.सादर
प्रत- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, अहिल्यानगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with OKEN Scanner